महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६९ /२०२३ दि.२५/०४/२०२३

## ''वाहतूक नियंत्रण अधिसुचना''

**ज्याअर्थी,** ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात ठाणे वाहतूक विभाग अंतर्गत कोपरी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत MMRDA तर्फे जुना कोपरी रेल्वे ब्रिज ते भास्कर कट येथील नवीन सबवे व भास्कर कट ते नवीन कोपरी रेल्वे ब्रिजचे सुरूवातीस खोदकाम करून डांबरीकरणाचे काम करण्यात येणार आहे. नमूद ठिकाणची वाहतूक पुर्णपणे बंद ठेवून पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) मुंबई (आनंदनगर चेकनाका) कडून फॉरेस्ट नाका – कोपरी सर्कल – जुना कोपरी रेल्वे ब्रिज मार्गे भास्कर कट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जुना कोपरी रेल्वे ब्रिजचे सुरूवातीस 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**प्रवेश बंद –** २) कोपरी गाव सिध्दार्थनगर कडून जुना कोपरी रेल्वे ब्रिज मार्गे भास्कर कट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जुना कोपरी रेल्वे ब्रिजचे सुरूवातीस 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नवीन कोपरी रेल्वे ब्रिज वरून भास्कर कट मार्गे संत नामदेव ब्रिज वरून अथवा ब्रिज खालून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) तीन हात नाका मुख्य रस्त्याने गुरूद्वारा मार्गे कोपरी सर्कल कडे जाणाऱ्या जड अवजड वाहनांना **गुरूद्वारा कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने आनंदनगर पोलीस चौकी येथून यू टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) तीन हात नाका सर्व्हिस रोडने रघुवीर हॉटेल कडून कोपरी सर्कल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या हलक्या वाहनांना **तुळजाभवानी मंदिर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सुचिता सोसायटी कडून डावे बाजूस वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. २६/०४/२०२३ ते दि. २१/०५/२०२३ रोजीपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई—विरार महानगरपालिका.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग.

२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CS CamScanner